**<u>ठळक बातम्या</u>**

- वस्तू आणि सेवा कराचे सुधारित दर देशभरात लागू
- देशभरातल्या आणखी २५ लाख कुटुंबांना पीएम उज्ज्वला गॅस जोडणी द्यायचा सरकारचा निर्णय
- मेट्रो ४ चे सर्व टप्पे च्या पुढच्या वर्षअखेरपर्यंत प्रवाशांसाठी खुले होतील, अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही
- महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर अबुजमाड भागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत कट्टा रामचंद्र रेड्डी आणि कद्री सत्यनारायण रेड्डी हे दोन प्रमुख नक्षलवादी ठार

**आणि**

- महाराष्ट्रात जोरदार पावसामुळे राज्यात अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा आजपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

(जीएसटी दरांतल्या या सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि मध्यमवर्ग, युवा आणि देशभरातल्या ग्राहकांना मोठा फायदा होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. जीएसटीचे नवे दर म्हणजे फक्त कर नसून जीएसटी बचत उत्सव आहे, आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं हे अतिशय महत्त्वाचं पाऊल आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

*जीएसटी प्रणालीत झालेल्या सुधारणा म्हणजे गरीब, युवा, शेतकरी आणि महिलांसाठी काम करण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वचनबद्धतेचं प्रतीक आहे, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली.*

*करप्रणालीतल्या सुधारणा हे एक क्रांतिकारी पाऊल असल्याचं मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केलं.*

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस***

*या नव्या करप्रणालीत शालेय वस्तूंवरचा जीएसटी पूर्ण रद्द करण्यात आला आहे. याबद्दल ऐकू या एका शिक्षकाची प्रातिनिधिक प्रतिक्रिया.*

***होल्ड... बाईट)***

या जीएसटी सुधारणा देशाच्या आर्थिक वृद्धीला गती देतील, असा विश्वास केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज व्यक्त केला. जीएसटीमधील दरांत घट झाल्यामुळे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात  सुमारे २० कोटी रुपयांनी वृद्धी होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रासह देशभरात आज घटस्थापनेनं शारदीय नवरात्रौत्सवाला सुरुवात झाली. महाराष्ट्रातल्या साडे तीन शक्तिपीठांमध्येही विधिवत घटस्थापना करण्यात आली.

**<><><><><>**

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी देशभरातल्या आणखी २५ लाख कुटुंबांना पीएम उज्ज्वला गॅस जोडणी द्यायचा निर्णय सरकारनं घेतला आहे. यामुळे घरोघरी आनंदाचं वातावरण तयार होणार असून महिला सक्षमीकरणाच्या संकल्पाला

बळकटी मिळणार आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अरुणाचल प्रदेशाची राजधानी इटानगर इथं सुमारे ५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास कांमांची पायाभरणी केली. व्हायब्रन्ट व्हीलेज उपक्रमाच्या यशामुळे सामान्य जनतेचं आयुष्य सुलभ झालं आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. अरुणाचल प्रदेशाचा विकास म्हणजे भाजपाच्या दुहेरी इंजिन सरकारमुळे मिळणाऱ्या दुहेरी लाभांचं उद्धरण आहे असंही ते म्हणाले. ईशान्येकडील राज्ये देशाच्या विकासाची प्रेरक शक्ती बनत आहेत , असं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्र्यांनी इटानगर इथं २ मोठ्या जलविद्युत प्रकल्पांची आणि १० पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी केली. त्यांनी तिथल्या स्थानिक व्यापाऱ्यांशी आणि नवउद्योजकांशी संवादही साधला. व्यापाऱ्यांनी सुगंधी चहा, रुचकर लोणची, बेकरी पदार्थ आणि हस्तकलेचे विविध नमुने प्रदर्शित केल्याचं, प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मोदी यांनी आज त्रिपुरामधे उदयपूर इथल्या त्रिपुर सुंदरी माता मंदिराच्या पुनर्विकसित परिसराचं उदघाटनही केलं. प्रधानमंत्र्यांनी मंदिरात पूजा केली तसंच या पुरातन मंदिराचं वस्तू सौंदर्य उलगडणाऱ्या प्रदर्शनालाही भेट दिली. प्रसाद योजने अंतर्गत ही विकासकामं करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

मेट्रो ४ च्या पहिल्या टप्प्यातली चाचणी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाली. ही मेट्रो वडाळा, घाटकोपर, मुलुंड, कासारवडवली, गायमुख या मार्गावरून धावणार आहे. या मार्गाची लांबी ३५ किलोमीटर असून यासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च येणार

आहे, पुढच्या वर्षीच्या अखेरपर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली.

**मुख्यमंत्री बाईट होल्ड**

पूर्व उपनगरं, पश्चिम उपनगरं, मुंबई शहर आणि ठाणे शहर या सर्व मार्गांना जोडणारा हा मार्ग असेल. पुढे ही मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला जोडणाऱ्या मेट्रो ११ ला जोडली जाणार आहे. त्यामुळे ५८ किमी लांबीची ही मार्गिका देशातील सगळ्यात मोठी मेट्रो मार्गिका असेल. या मेट्रोमधून दररोज १३ लाखापेक्षा जास्त प्रवासी प्रवास करतील, अशी अपेक्षा असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

आजचा दिवस ठाणेकरांसाठी अतिशय आनंदाचा आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर नारायणपूरच्या अबुजमाड भागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत कट्टा रामचंद्र रेड्डी आणि कद्री सत्यनारायण रेड्डी हे दोन प्रमुख नक्षलवादी ठार झाले. हे दोघेही नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचे सदस्य असून, त्यांचा खात्मा करुन सुरक्षादलांनी नक्षलावाद्यांचा कणाच मोडला आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. देशाची सुरक्षादलं नक्षलवाद्यांचं शीर्ष नेतृत्व पद्धतीशिरपणे खिळखिळं करत आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात जोरदार पावसामुळे काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असून, अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे.

धाराशिव जिल्ह्यात परंडा आणि भूम तालुक्यात कालपासून मुसळधार पाऊस पडत आहे. परंडा तालुक्यातल्या नद्यांना पूर आला असून अनेक गावांमधे घरात पाणी शिरल आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, लष्कर आणि एनडीआरएफ

च्या पथकानं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं असून लाखी आणि ढग पिंपरीमधल्या लोकांना सुरक्षितस्थळी हलवलं आहे. देवगावमधल्या २७ जणांना एनडीआरएफच्या विमानातून सुरक्षित स्थळी हलवलं आहे. भूम तालुक्यात पुराच्या पाण्यात एक महिला वाहून गेल्याचं वृत्त आहे.

**बीड** जिल्ह्यात माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाला आहे. त्यामुळे माजलगाव धरणाचे अकरा दरवाजे उघडले आहेत. **पैठणचं** जायकवाडी धरण जवळपास पूर्ण भरलं आहे. त्यामुळे धरणाचे १८ दरवाजे उघडले आहेत. **बुलढाणा** जिल्ह्यातल्या पाडळी, मढ परिसरात आज ढगफुटीसारखा पाऊस पडल्यानं शेतातलं पीक पाण्याखाली गेलं आहे. या पावसामुळे पैनगंगा नदी आपलं पात्र सोडून वाहत आहे.

**लातूर** जिल्ह्यात आजही मुसळधार पाऊस पडला. नदी नाले, ओढ्याना पूर आल्यानं अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मांजरा, निम्न तेरणा, तावरजा प्रकल्पाचे दरवाजे उघडल्यानं अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. **अनेक ठिकाणी शेतात पावसाचे पाणी साचल्यानं सोयाबीन, कांदा, मुग, उडीद पिकं वाया गेली आहेत.**

**<><><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज जाणून घेऊ या स्मार्ट सिटी योजनेद्वारे शहरी भागांसाठी सरकार करत असलेल्या कामाबद्दल…

***होल्ड… व्हीसी-***

स्मार्ट सिटी या योजनेअंतर्गत देशातल्या शहरांचा चेहरामोहरा बदलत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जून २०१५ मध्ये सुरू केलेल्या या योजनेतून नागरिकांच्या आकांक्षांचं रूपांतर सत्यात होत आहे. स्मार्ट आणि शाश्वत मार्गाने देशाच्या शहरांमध्ये राहणाऱ्यांचं जीवनमान उंचावणं हा या योजनेचा उद्देश आहे. ही

संपूर्ण योजना म्हणजे एक जनचळवळ असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुण्यात स्मार्ट सिटी प्रकल्पांचं उद्घाटन करताना केलं होतं…

***होल्ड… बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

गेल्या एका दशकात या योजनेची चांगली प्रगती झाली असून ८ हजारापेक्षा जास्त प्रकल्पांपैकी जवळपास ९४ टक्के प्रकल्प पूर्ण झाले आहेत. शिवाय, १३ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. या योजनेअंतर्गत आत्तापर्यंत १ लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्प दहा वर्षं पूर्ण करत असताना या योजनेचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

//<><><><><>//